BDC LIBRARY
New Paper Clipping
A.Y. 2023-2024

# सतार वादनाने पाटणवासीय मंत्रमुग्ध




पाटण : सतारवादन करताना पंडीत जोशुआ फेनबर्ग. समवेत उन्मेष बॅनर्जी.

शहर प्रतिनिधी
पाटण

जागतिक कीर्तीचे सतारवादक पंडित जोशुआ फेनबर्ग यांच्या सतारवादनाने पाटणमधील रसिक प्रेमींना मंत्रमुग्ध करून टाकले. पं. जोशुआ यांचे सतारवादन व तबला वादक उन्मेष बॅनर्जी यांच्या जुगलबंदीने प्रेक्षकांना खिळवून ठेवले होते. माजी मंत्री विक्रमसिंह पाटणकर यांच्यासह पाटणच्या दर्दी प्रेक्षकांनी या परदेशी कलाकारांना उत्स्फूर्तपणे दाद दिली.

चौगुले ग्लोबल ग्रुप गोवा व चौगुल इंडस्ट्रीज आणि कोयना एज्युकेशन सोसायटी, पाटण यांच्या सहकार्याने अमेरिकेतील सुप्रसिद्ध युवा सतार वादक पंडित जोशुआ फेनबर्ग यांचा सतार वादनाचा कार्यक्रम आयोजित केला होता. यावेळी चौगुले इंडस्ट्रीजचे चेअरमन विजय चौगले, माजी मंत्री विक्रमसिंह पाटणकर, संस्थेचे अध्यक्ष डॉ. सोपानराव चव्हाण, जनरल सेक्रेटरी अमरसिंह पाटणकर, सेक्रेटरी डॉ. सुहास देशमुख, याज्ञसिंह पाटणकर, संचालक संजीव चव्हाण यांची प्रमुख उपस्थित होती.

पंडित जोशूआ फेनबर्ग यांच्या सतार वादनाची सुरवांत बसंत बहार या रागाने झाली. यावेळी त्यांनी सादर केलेल्या विविध रागातील सतार वादनामुळे उपस्थित श्रोत्यांची मने जिंकली. केलेल्या स्वरलहरींनी चैतन्य निर्माण झाले होते. एक एक छेडलेली तार त्यातून निघालेला स्वंर मनावर चैतन्याच्या लहरींचा वर्षाव करत होता. शास्त्रीय संगीत वादनाच्या दर्जेदार बैठकीने पाटणमध्ये वसंत पंचमी साजरी झाली.